# रे.क.नं. ५४/२०१७ नि. २१ खालील आदेश.

(CNR No.MHKO11004162017)

वादीने सदरचा अर्ज मुदत कायद्याच्या कलम ५ प्रमाणे प्रतिवादी क्रमांक २४ चे वारस अभिलेखावर घेणेस झालेला ४ वर्षे ९ महिने बावीस दिवसांचा विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी याच अर्जावर म्हणणे दाखल करुन वादीने दिलेले कारण रास्त व संयुक्तीक नाही. मयताचे वारस रेकॉर्डवर घेणेचे कामी वादींनी तत्परतेने प्रयत्न केलेचे नमुद केलेले नाही. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी, प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. सदर अर्जाचे कामी मी खालीलप्रमाणे मुद्दे काढीत असून त्याप्रमाणे कारणासह निष्कर्ष नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने विलंब माफीचे योग्य कारण दिलेले आहे का ? | होय. |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा-

### मुद्दा क्रमांक १ करिता-

४. वादीने विलंबाबाबत त्यास प्रतिवादी क्र. २४ चा मृत्युबाबत त्यांना बेलिफ अहवाल आलेनंतरच कळून आलेले आहे. तसेच वादी व प्रतिवादी हे वेगवेगळया ठिकाणी राहणेस आहेत. त्यामुळे स्थानीक लोकांचेकडून यातील प्रतिवादी नं. २४ यांचे सर्व वारसांची माहिती काढणे अडचणीचे व जिकिरीचे झाले होते. त्यामुळे इतक्या कालावधीचा विलंब झाला असे सांगीतले आहे. वादी व प्रतिवादी हे वेगवेगळ्या गांवी राहणेस असल्यामुळे त्यांना प्रतिवादी क्र.२४ हे मयत झालेबाबतची माहिती त्वरीत समजून आली नाही. तसेच सदरची माहिती ही वादी यांना बेलिफ अहवाल

आल्यानंतरच समजून आली त्यामुळे त्यांना प्रतिवादी नं. २४ चे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झाला असलेबाबतचा युक्तीवाद हा योग्य असल्याचे दिसून येते. वादीने शपथेवर झालेल्या विलंबाबाबत कारण नमुद केलेले आहे. तसेच वादीचा दावा हा हक्कज्ञापनाचा व अतिक्रमण काढून मिळणेबाबतचा असल्याने झालेला विलंब माफ होवून प्रतिवादी क्र.२४ च्या वारसांना अभिलेखावर घेणे हे दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेस मदतच होणार आहे. त्यामुळे मी वादीचा वारस रेकॉर्डवर घेणेसाठीचा अर्जास झालेल्या दिवसांचा विलंब माफ करणेच्या निर्णयावर येवून मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे. मुद्दा क्रमांक २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

अर्जदारचा नि.२१ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

सही/-
दिनांक ०६.१२.२०१८. (सं.मा.जाधव)
दुसरे दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पेठ वडगांव.

## CERTIFICATE.

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same,word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Mrs. Rajashri Rajendra Sawant (L.G.) |
| Name of Court | Shri. S.M.Jadhav, 2nd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Peth Vadgaon |
| Date of Dictation | 06.12.2018. |
| Judgment signed by the P.O. on | 06.12.2018. |
| Judgment/Order uploaded on | 07.12.2018. |